नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०४/२०२५ (बुधवार)**

---

## उष्माघातापासुन पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या संरक्षणाकरीता मा. पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांचा नाविन्यपुर्ण उपक्रम

सध्या उन्हाळा सुरू झाला असुन पोलीसांना त्यांचे कर्तव्य बजावतांना कित्येक तास उन्हात फिराव लागते किंवा उभे राहव लागते.यामुळे त्यांच्या आरोग्यावर प्रभाव पडण्याची शक्यता आहे. ही बाब गंभीर असुन याची दखल मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी घेवुन  नाविन्यपुर्ण उपक्रम राबवुन त्या साठी उपयोजना करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन आणि शाखा प्रभारी अधिकारी यांना खालील प्रमाणे सुचाना दिल्या आहे.

१.प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या करीता नेहमी केळी उपलब्ध राहतील अशी व्यवस्था करावी.

२.कर्तव्य बजावतांना उन्हाच्या प्रभावामुळे प्रकृती खालावुन अशक्तपणा आल्यास त्यांना त्वरीत देण्यासाठी इलेक्टॉल पावडर व ओआरएस नेहमी उपलब्ध राहतील अशी व्यवस्था करावी.

३.प्रत्येक दिवशी सकाळी हजेरीवर पोलीस अधिकारी/अंमलदार यांना कर्तव्यावर पाठविण्यापुर्वी त्यांनी नाश्ता केला किंवा कसे याबाबत विचारपुस करून खात्री करावी.

४.उसाचा रस आणि नारळ पाणी विक्रेत्यांना पोलीस स्टेशनचे जवळच उपलब्ध ठेवावे.

मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरील प्रमाणे सुचना निर्गमित करून तात्काळ दिलेल्या सुचनांची पुर्तता करण्याबाबत प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे. तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व अधिकारी आणि अंमलदार यांना उन्हापासुन स्वत:ची काळजी घेवुन सुरक्षीतता बाळगुन कर्तव्य करण्याबाबत सुचना दिल्या आहेत.

# रामटेक उपविभागाअंतर्गत अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ६ गुन्हे नोंद , ७ आरोपी अटक ,एकुण १ कोटी ६० लाख ६८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

## उपविभागिय पोलीस अधिकारी रामटेक यांच्या नेतृत्वात पोलीस स्टेशन रामटेक,पोलीस स्टेशन अरोली आणि पोलीस स्टेशन देवलापार यांची कारवाई

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नजर असुन त्यांनी अवैध रेती उपसा व वाहतुक बाबत कारवाई करण्याबाबत आदेंश दिलेले आहेत. सदर आदेशान्वये श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधीकारी रामटेक यांनी त्यांच्या उपविभागात अवैध रेती उपसा व वाहतुक बाबत कारवाई करणेकामी उपविभागातील सर्व प्रभारी आधिकारी यांना आदेशीत केले त्यावरून श्री रमेश बरकते, उप विभागीय पोलीस अधीकारी रामटेक यांच्या नेतृत्वात रामटेक उपविभागाअंतर्गत खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**कारवाई कं १.** दिनांक ०८/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस, पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, रामटेक कडुन मनसर कडे अवैधरित्या रेतीने भरलेला टिप्पर येत आहे. आशा माहीती वरून मौजा मनसर चौक येथे नाकाबंदी करून ट्रक क्र. **एम एच** ३४ बी. झेड.२५३० या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे** संकेत गोविंदा नाकाडे रा. साइनगर मौदा ता. मौदा जि. नागपूर **हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नव्हाता. मालकाबाबत विचारपुस केली असतां सदर वाहन त्याच्याच मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ६०,००० /— रूपये आणि २)** ट्रक क्र. **एम एच** ३४ बी. झेड.२५३० **किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण २५,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.नमुद चालक मालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**कारवाई कं २.** दिनांक ०९/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, चारगाव रोडने रामटेक कडे अवैधरित्या रेतीने भरलेला टिप्पर येत आहे. आशा माहीती वरून मौजा चारगाव येथे रोडवर नाकाबंदी करून टिप्पर क्र. **एम एच ४० सी.टी.४९५६** या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे कमलेश रमाकांत आठवले, वय ४१ वर्षे, रा.चारगाव दफाई ,बिजेवाडा ता.रामटेक, जि.नागपूर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नव्हाता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असतां वाहन मालक नामे स्वप्निल नरेश बारई,रा सोसायटी कॉलनी, नाका नंबर १०, वाडी, नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) १२ ब्रास रेती किंमती ७२,०००**

/— **रूपये आणि २)** टिप्पर क्र. **एम एच** ४० सी.टी.४९५६ **किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण ४०,७२,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**कारवाई क्रं ३.** दिनांक ०९/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, मौजा भिलेवाडयाकडुन शितलवाडी मार्गे अवैधरित्या रेतीने भरलेला टिप्पर येत आहे. आशा माहीती वरून शितलवाडी ते चारगाव रोडवर नाकाबंदी करून टिप्पर क्र. **एम एच** ४० ए.के ०२८३ या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे राकेश देविदास भोयर, वय २९ वर्षे, रा. जुनी कामठी ,गोंडेगाव ,ता पारशिवणी, जि. नागपूर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नव्हाता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असतां वाहन मालक नामे इंद्रजीत वहीले, रा. अजनी ता कामठी, जि.नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) ०८ ब्रास रेती किंमती ४८,००० /— रूपये आणि २)** टिप्पर क्र. **एम एच** ४० ए.के ०२८३ **किंमती २२,००,०००/— रूपये असा एकुण २२,४८,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**कारवाई क्रं ४.** दिनांक ०९/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, मौजा भिलेवाडयाकडुन शितलवाडी मार्गे अवैधरित्या रेतीने भरलेला टिप्पर येत आहे. आशा माहीती वरून शितलवाडी ते चारगाव रोडवर नाकाबंदी करून टिप्पर क्र. **एम एच ४० सी.डी ९४४४** या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे प्रकाश रामराव वरठे, वय ३६ वर्षे, रा. उटी पोस्ट चांपा ता उमरेड, जि. नागपूर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नव्हाता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असतां वाहन मालक नामे यशवंतराव विश्वनाथ रोकडे, रा.अध्यापक नगर ले आउट हिंगणा रोड नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) १२ ब्रास रेती किंमती ७२,००० /— रूपये आणि २) टिप्पर क्र. एम एच ४० सी.डी ९४४४ किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण २५,७२,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**कारवाई क्रं ५.** दिनांक ०९/०४/२०२५ रोजी अरोली पोलीस हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, मौजा हिंगणा येथे सांड नदीच्या पात्रात अवैधरित्या रेतीचा उपसा करून वाहनात भरण्यात येत आहे. आशा माहीती वरून पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले असता **एक विनाक्रमांचा लाल रंगाचा स्वराज ७४४ एफई कंपनीचा ट्रॅक्टर**

**ट्रॉलीसहीत मिळुन आला.** वाहन चालक **आरोपी नामे पिंटु शंकर पाटील, वय २९ वर्षे, रा. हिंगणा ता.मौदा,जि. नागपूर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नव्हाता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असतां वाहन मालक नामे युवराज गुलाबराव चौधरी, रा. हिंगणा ता.मौदा,जि. नागपूर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) १ ब्रास रेती किंमती ६,००० /— रूपये आणि २) विनाक्रमांचा लाल रंगाचा स्वराज ७४४ एफई कंपनीचा ट्रॅक्टर ट्रॉलीसहीत, किंमती ५,००,०००/— रूपये ३) होंडा शाईन मोटर सायकल एम.एच.४० बी.झेड. ३७०२ किंमती ६०,०००/— रूपये असा एकुण ०५,६६,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**कारवाई क्रं ६.** दिनांक ०९/०४/२०२५ रोजी देवलापार पोलीस हद्दीत पेट्रोंलिंग करीत असतांना त्यांना माहीती प्राप्त झाली की, जबलपुर ते नागपुर हाय वे ने अवैधरित्या रेतीचा रेतीची वाहतुक करण्यात येत आहे. आशा माहीती वरून पोलीसांनी चोरबाहुली बसस्टॉप येथे नाकाबंदी करून **टिप्पर क्र. एम एच ४० डी.ए.७८७३** या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **आरोपी नामे विक्की प्रकाश मेश्राम, वय २७ वर्षे, रा. बिना संगम ता. कामठी,जि. नागपूर हा मिळुन आला. त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नव्हाता. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असतां वाहन मालक नामे आदित्य सत्यजीत पांडे, वय ३९ वर्षे, रा. दहेगाव रंगारी ता. सावनेर ,जि. नागपूर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये आणि २) टिप्पर क्र. एम एच ४० डी.ए.७८७३ किंमती ४०,००,०००/— रूपये असा एकुण ४०,५०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. चालक आणि मालक दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

**सदर कारवाईत एकुण १,६०,६८,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.नमुद चालक मालक आरोपीतांच्या विरूध्द कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,सह कलम ३ सार्व संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये पोस्टे रामटेक येथे ४ गुन्हे ,पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**


उप विभागीय पोलीस
रामटेक विभाग. जि. नागपूर
TATA


744 FE


73
ASHOK LEYLAN
MH40DA7873

# अल्पवयीन बालीकेसोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. भिवापुर :— अल्पवयीन फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भिवापुर येथे अप क्र. ३०२/२२ कलम ३७६,३७६(२)(जे),(एन),३७६(३),५०६भादंवि सहकलम ४,६,८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर घटना दिनांक डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यंत घडली आहे. यातील अल्पवयीन फिर्यादी ही आपले घरी एकटी असतांना नमुद गुन्हयातील आरोपी नामे **अविनाश एकनाथ मांढरे, वय २२ वर्षे, रा. कारगाव ता. भिवापुर जि. नागपुर** याने पिडीतेला एक काम सांगतो तु माझे घरी ये असे म्हणुन पिडीतेला आपल्या घरी बोलावुन पिडीता ही अल्पवयीन आहे हे माहीती असतांना तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर सुध्दा आरोपीने २ ते ३ वेळा पिडीतेला घरी बोलावुन पिडीतेसोबत लैगिक अत्याचार केला त्यामुळे पिडीता गर्भवती झाली आणि तिला मुलगी झाली. अशा पिडीतेच्या तोडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद झाला होता.

सदर प्रकरणाचे तपास **सहा.पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे नेम. उमरेड पोलीस स्टेशन कॅम्प पोलीस स्टेशन भिवापुर** यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात **मा. एक्स्ट्रा डी.जे. श्री एस. ए. श्रीखंडे** यांनी दिनांक **०९/०४/२०२५ रोजी** आरोपी नामे **अविनाश एकनाथ मांढरे, वय २२ वर्षे, रा. कारगाव ता. भिवापुर जि. नागपुर याला सदर गुन्हयात कलम ३७६(३) भादंवि मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड,दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास २) कलम ५०६ भादवि मध्ये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने **एपीपी श्रीमती व्ही.डब्ल्यु. बालपांडे** यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन **श्रेणी पोलीस उपनिरीक्षक तुलाराम खडसे पो.स्टे.भिवापुर या**ंनी मदत केली आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने